दैनिक आरंभ मराठी
www.arambhmarathi.com

सुविचार

जेव्हा सत्याची साथ आपल्याकडे असते, तेव्हा जगाच्या विरोधाची भीती बाळगण्याचे कारण नसते.

SS MOBILE®
धाराशिव जिल्ह्यात सर्वाधिक मोबाईल विक्री होणारे, विश्वसनीय ठिकाण.
(नवनवीन ऑफर जाणून घेण्यासाठी आजच संपर्क करा)
जिजाऊ चौक, बार्शी नाका, धाराशिव.
Mo.7841810075/8329723615

■ कोल्हापूर ■ सांगली ■ सातारा ■ सोलापूर ■ धाराशिव ■ लातूर ■ वर्ष 3 रे ■ अंक 51 ■ मंगळवार, 12 मे 2026 ■ पाने 04 ■ किंमत रू.4 ■ epaper.arambhmarathi.com

# कधी संपणार ही वाहतूक कोंडी?, धाराशिवकरांचा संताप

आरंभ मराठी । धाराशिव

शहरातील रस्त्यांच्या समस्येने नागरिक अक्षरशः हैराण झाले असून प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे वाहतूक कोंडी आणि धुळीचा त्रास दिवसेंदिवस वाढत चालला आहे. जिजाऊ चौक ते शरद पवार हायस्कूल दरम्यान सुरू असलेल्या रस्त्याच्या धिम्या गतीच्या कामामुळे नागरिकांचा संयम सुटू लागला आहे. तब्बल तीन महिन्यांपासून काम सुरू असतानाही अजून एका बाजूचे काम पूर्ण झालेले नाही. परिणामी या मार्गावर दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. एकीकडे रस्त्यांची दुरवस्था, त्यात ठेकेदारांकडून रस्ते खोदून कामे अर्धवट सोडली जात असल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. कामाला कोणतीही गती नसल्याने व्यापारी, वाहनचालक आणि विद्यार्थ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे. प्रशासन आणि नगरपालिकेकडून मात्र याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले जात असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.रस्त्यावरील धुळीमुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. ठेकेदाराकडून नियमित पाणी मारले जात नसल्याने दुचाकीस्वार, पादचारी आणि शाळकरी विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. शिवाय सुरू असलेल्या कामाच्या गुणवत्तेबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. दररोज सकाळी आणि सायंकाळी या मार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असून शहरातील वाहतूक व्यवस्थेचा पूर्णपणे बोजवारा उडाल्याचे चित्र आहे. नागरिकांनी तातडीने काम पूर्ण करून वाहतूक सुरळीत करण्याची मागणी केली आहे.




# उष्णतेचा कहर, ३६ प्रकल्प पडले कोरडे

## २२६ प्रकल्पातील उपयुक्त पाणीसाठा केवळ २६ टक्क्यांवर

## पाऊस लांबल्यास भीषण पाणीटंचाईचे संकट

आरंभ मराठी । धाराशिव

**उष्णतेचा पारा पुन्हा एकदा ४२ ते ४३ अंशांपर्यंत गेल्यामुळे धाराशिव जिल्ह्यातील पाणीसाठ्यात कमालीची घट होत असून, उपयुक्त पाणीसाठा केवळ २६ टक्के इतका राहिला आहे. यावर्षी हवामान विभागाने अल निनोचे संकट असल्याचा अंदाज वर्तविला असल्यामुळे पाऊस लांबल्यास पुढील काही दिवसात जिल्ह्याला भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे. बाष्पीभवन आणि बेसुमार उपशामुळे दररोज उपयुक्त पाणीसाठ्यापैकी एक टक्का पाणी कमी होत आहे. त्यामुळे संभाव्य धोके ओळखून पिण्याचे पाणी राखून ठेवण्यासाठी उपाययोजना कराव्या लागणार आहेत.**

धाराशिव जिल्ह्यात मागील हंगामात जोरदार अतिवृष्टी झाली. मागील वर्षी सरासरीच्या तब्बल १६१ टक्के पाऊस पडला. जिल्ह्यातील सर्वात मोठा प्रकल्प असलेल्या सीना कोळेगाव धरणासह तेरणा मध्यम प्रकल्प, कुरनूर, तुरोरी, बेनितुरा, साकत असे जिल्ह्यातील सर्व छोटे मोठे प्रकल्प मागील वर्षी ओसंडून वाहिले होते. मागील वर्षी ऑक्टोबर महिन्यात देखील जोरदार अतिवृष्टी झाल्यामुळे हेच पावसाचे पाणी नोव्हेंबर, डिसेंबर पर्यंत मोठ्या प्रमाणात दिसत होते. मात्र मागील पाच महिन्यात परिस्थितीत मोठा बदल झाला असून, डिसेंबर महिन्यात जिल्ह्यात १००% असणारा पाणीसाठा आता २६ टक्क्यांवर आलेला आहे. ऑक्टोबर महिन्यात ओसंडून वाहत असलेला सिना कोळेगाव प्रकल्प देखील तळाला जात असून सध्या सीना कोळेगाव प्रकल्पात केवळ 23 टक्के उपयुक्त जलसाठा शिल्लक आहे. तेरणा मध्यम प्रकल्पाची अवस्था जरा बरी असून या प्रकल्पात ४४.९१ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. मागील वर्षी याच तारखेला तेरणा प्रकल्पात ४९ टक्के पाणीसाठा शिल्लक होता. ऑक्टोबर, नोव्हेंबर महिन्यापर्यंत ओसंडून वाहत असणारे प्रकल्प सध्या कोरडे पडले असून, जिल्ह्यातील ३६ प्रकल्पांनी तळ गाठला असून या प्रकल्पात पाणीच शिल्लक नाही. तर ९० प्रकल्पातील पाणी २५ टक्क्यांपेक्षा कमी झाले आहे. बेसुमार उपशामुळे आणि बाष्पीभवनामुळे दररोज सरासरी एक छोटा प्रकल्प कोरडा पडत आहे. सर्वात मोठा प्रकल्प असलेल्या सीना कोळेगाव प्रकल्पात २३% पाणीसाठा आहे. १७ मध्यम प्रकल्पात २८% आणि २०८ लघु प्रकल्पात २६.९८% असे जिल्ह्यातील २२३ प्रकल्पात सध्या २६.८८% पाणीसाठा शिल्लक आहे. मागील वर्षी हा पाणीसाठा १८% इतका कमी होता. मागील वर्षीपेक्षा यावर्षी पाणीसाठा जास्त असला तरी मागील वर्षी मे महिन्यातच पूर्वमोसमी पाऊस जोरदार पडल्यामुळे पाणीटंचाईचे संकट जाणवले नव्हते.



### बेसुमार उपशावर नियंत्रण नाही

यावर्षी अल निनोचे संकट असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस पडेल असा अंदाज असला तरीही पाटबंधारे आणि उपसा सिंचन विभागाकडून अजूनही पाणीव्यवस्थापनासाठी प्रयत्न होत नसल्याचे दिसते. सध्या सर्वच तालुक्यातील प्रकल्पांमधून बेसुमार पाणीउपसा सुरू आहे. यंदा ऊसाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे पाण्याची मागणी जास्त आहे. त्यामुळे दिवसेंदिवस पाणीपातळी खालावत चालली आहे.

### उपलब्ध असलेला पाणीसाठा

**सीना कोळेगाव - २३.०८%**
**तेरणा मध्यम प्रकल्प - ४४.९१%**
**१७ मध्यम प्रकल्प - २८%**
**२०८ लघु प्रकल्प - २६.९८%**
**एकूण - २६.८८%**



### जूनच्या पहिल्या आठवड्यात सर्व प्रकल्प कोरडे पडण्याची शक्यता

सध्या वाढलेल्या तापमानामुळे पाण्याचे बाष्पीभवन मोठ्या प्रमाणात होत आहे. उपयुक्त पाणीसाठ्यापैकी सरासरी एक टक्का पाणी दररोज कमी होत आहे. ही परिस्थिती कायम राहिल्यास जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जिल्ह्यातील सर्व प्रकल्प कोरडे पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाकडून पाणीबचतीसाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. प्रत्येक जलाशयात पिण्याचे पाणी राखून ठेवण्यासाठी पाणी उपशावर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे. पाऊस काही दिवस लांबल्यास जून महिन्यात भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो.

### विहिर अधिग्रहण आणि टँकर सुरू

जिल्हा पाणीपुरवठा विभागाने संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता पाणीटंचाईचा आराखडा तयार केला आहे. सध्या धाराशिव तालुक्यातील येडशी येथे टँकरने पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. तर भूम तालुक्यातील पाच खाजगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. जिल्ह्यातील इतरही काही गावांनी टँकरची मागणी प्रशासनाकडे केली आहे. त्यामुळे या आठवड्यात टँकरची संख्या वाढण्याची शक्यता आहे.

# मत्स्य विभागाकडे तक्रार केल्याच्या कारणावरुन महिलेला कोयत्याने मारहाण; दागिने व रोकड लंपास

**परंडा** :- परंडा तालुक्यातील खंडेश्वरवाडी येथे मत्स्य विभागाकडे तक्रार दिल्याच्या कारणावरून एका महिलेला मारहाण करून गंभीर जखमी केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी आंबी पोलीस ठाण्यात नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी सोनाबाई वसुदेव लष्कर (वय ४०, रा. खंडेश्वरवाडी, ता. परंडा) या दि. ६ मे २०२६ रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास खंडेश्वरवाडी येथील तळ्याजवळील शेतात असताना आरोपींनी त्यांना अडवले. मत्स्य आयुक्त, धाराशिव येथे तक्रार अर्ज का दिला? असा जाब विचारत आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवून शिवीगाळ केली. यानंतर आरोपींनी लाथाबुक्क्यांनी तसेच लोखंडी कोयता व दगडाने मारहाण करून सोनाबाई लष्कर यांना गंभीर जखमी केले. यावेळी त्यांच्या गळ्यातील गंठन, नेकलेस, कानातील फुले-झुबे तसेच पती वासुदेव लष्कर यांच्या खिशातील १५ हजार रुपयांची रोकड घेऊन आरोपी पसार झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. तसेच आरोपींनी जीवे मारण्याची धमकीही दिल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणी रेवण भोसले, चंद्रकांत भोसले, पृथ्वीराज भोसले, विशाल भोसले (रा. ताकमोडवाडी), देवा सिताराम डुकळे, नितीन लक्ष्मण जाधव, अमर लक्ष्मण जाधव, लक्ष्मण जाधव (रा. उंडेगाव, ता. परंडा) तसेच गोपीनाथ दगडे (रा. सालसे, ता. करमाळा, जि. सोलापूर) यांच्याविरुद्ध आंबी पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम 119(1), 118(1), 115(2), 189(2), 191(2), 191(3), 190, 333, 352, 351(2)(3) सह आर्म अ‍ॅक्ट कलम 4/25 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# येडेश्वरी मंदिरात पुन्हा सोनसाखळीची चोरी; चार दिवसांत दुसरी घटना

**येरमाळा** :- येरमाळा येथील प्रसिद्ध येडेश्वरी देवी मंदिर परिसरात भाविकांच्या गर्दीचा फायदा घेत सोनसाखळी चोरीची आणखी एक घटना घडली असून, मागील चार दिवसांतील ही दुसरी घटना असल्याने भाविकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी अंकुश परशुराम गवळी (वय ५५, रा. उपळाई ठोंगे, ता. बार्शी, जि. सोलापूर) हे आपल्या कुटुंबासह दि. ८ मे २०२६ रोजी येडेश्वरी देवीच्या दर्शनासाठी आले होते. दुपारी २ ते ३ वाजण्याच्या सुमारास मंदिरात दर्शन घेत असताना गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या सुन ऋतुजा गवळी यांच्या गळ्यातील सुमारे १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनी गंठण लंपास केले. चोरीस गेलेल्या दागिन्याची किंमत अंदाजे ९५ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे. या प्रकरणी अंकुश गवळी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून येरमाळा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, येडेश्वरी मंदिर परिसरात मागील चार दिवसांत चोरीची ही दुसरी घटना घडल्याने मंदिर परिसरातील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. भाविकांनी दर्शनावेळी मौल्यवान दागिने व वस्तूंची काळजी घ्यावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.

आरंभ मराठी

## ऑनलाइन प्रक्रिया व कागदपत्रांची अडचण ठरली कारणीभूत

# आरटीई प्रवेश प्रक्रियेला थंड प्रतिसाद; निवड झालेल्या २४७ विद्यार्थ्यांनी घेतला नाही प्रवेश

आरंभ मराठी । धाराशिव

शिक्षण हक्क कायद्यानुसार (आरटीई) आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना खासगी शाळांमध्ये २५ टक्के राखीव जागांवर मोफत शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली जाते. मात्र यंदा धाराशिव जिल्ह्यातील आरटीई प्रवेश प्रक्रियेला अपेक्षित प्रतिसाद मिळाला नसल्याचे चित्र समोर आले आहे. जिल्ह्यातील अनेक जागा अद्याप रिक्त असून निवड झालेल्या विद्यार्थ्यांपैकी मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी प्रवेशच घेतलेला नाही. धाराशिव जिल्ह्यात यंदा आरटीई अंतर्गत ११२ खासगी शाळांनी नोंदणी केली होती. या शाळांमध्ये एकूण १ हजार २८६ जागा उपलब्ध करण्यात आल्या होत्या. या जागांसाठी जिल्हाभरातून २ हजार ६९७ विद्यार्थ्यांचे ऑनलाइन अर्ज प्राप्त झाले होते. त्यानंतर ऑनलाइन सोडतीद्वारे १ हजार २२८ विद्यार्थ्यांची निवड करण्यात




आली. मात्र निवड झालेल्या विद्यार्थ्यांपैकी केवळ ९८१ विद्यार्थ्यांनीच प्रवेश निश्चित केले आहेत. तर तब्बल २४७ विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील अनेक जागा अद्याप रिक्तच राहिल्या आहेत. आरटीई प्रवेशासाठी यंदाही ऑनलाइन पद्धतीने प्रक्रिया राबविण्यात आली होती. मात्र ग्रामीण भागातील अनेक पालकांना ऑनलाइन प्रक्रियेबाबत अपुरी माहिती, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यात येणाऱ्या अडचणी तसेच शाळांचे अंतर या कारणांमुळे प्रवेश प्रक्रियेत अडथळे निर्माण झाल्याचे दिसून आले. काही पालकांनी वेळेत कागदपत्र पडताळणी पूर्ण न केल्यानेही अनेक विद्यार्थ्यांचे प्रवेश रखडले. शिक्षण विभागाकडून पात्र विद्यार्थ्यांच्या पालकांशी वारंवार संपर्क साधून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले होते. तरीदेखील अपेक्षित प्रतिसाद मिळाला नसल्याने प्रशासनासमोर रिक्त जागांचा प्रश्न कायम आहे. दरम्यान, आरटीई प्रवेशासाठी ८ मे ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली होती. अनेक पालकांना मुदतवाढ मिळेल अशी अपेक्षा होती. मात्र अद्याप प्रवेश प्रक्रियेला मुदतवाढ जाहीर करण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रवेशापासून वंचित राहिलेल्या पालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. पालकांकडून आरटीई प्रवेश प्रक्रिया अधिक सुलभ करण्याची मागणी होत असून ग्रामीण भागात जनजागृती वाढविण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेचे आज आयोजन

आरंभ मराठी । धाराशिव

जिल्हा परिषदेची सर्वसाधारण सभा मंगळवार(दि.१२) दुपारी २ वाजता कै. यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करण्यात आली असून, विविध विकासकामे, आर्थिक विषय तसेच प्रशासकीय निर्णयांवर या सभेत सविस्तर चर्चा होणार आहे. जिल्हा परिषद प्रशासनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या अनेक विषयांवर या बैठकीत निर्णय घेतले जाणार आहेत. सभेमध्ये शासन निर्णय व परिपत्रकांचे वाचन करण्यात येणार असून, स्थानिक लेखा परीक्षण अहवालास मान्यता देण्याबाबत चर्चा होईल. तसेच जिल्हा परिषदेच्या अधिनस्त असलेल्या जुन्या इमारतींचे निर्लेखन, रस्ते विकास योजनेस संमती, तसेच सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी जिल्हा परिषदेच्या स्वउत्पन्नाच्या सुधारित अंदाजपत्रकास मंजुरी देण्याचे प्रस्ताव सभेपुढे ठेवण्यात येणार आहेत. याशिवाय पंधराव्या वित्त आयोगांतर्गत विविध कामांच्या नियोजनास मान्यता देणे, तेरखेडा येथील आयुर्वेदिक दवाखाना मांडवा येथे स्थलांतरित करण्याबाबत चर्चा, जननी सखी योजनेच्या खर्चास मान्यता, तसेच ग्रामीण पाणी पुरवठा विभाग व उपविभागाच्या कार्यालयीन कामकाजासाठी संगणक संच खरेदी करण्याबाबत निर्णय घेतला जाणार आहे. सभेच्या वेळी अध्यक्षांच्या संमतीने इतर तातडीच्या विषयांवरही चर्चा करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. या सर्वसाधारण सभेला जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चनाताई पाटील, उपाध्यक्षा उषाताई गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियवंदा म्हाडदाळकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश काळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन) तुकाराम भालके, सर्व विषय समित्यांचे सभापती, जिल्हा परिषद सदस्य तसेच विविध विभागांचे प्रशासकीय अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

# सावित्रीच्या लेकींचे प्रेरणादायी यश

श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५






महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. राज्याचा बारावीचा निकाल ८९.७९ टक्के लागला. नेहमीप्रमाणे कोकण विभागाने या निकालात बाजी मारली. कोकण विभागाचा ९४.१४ टक्के निकाल लागला असून कोकण विभागाने राज्यात अव्वल स्थान पटकावले असून लातूर विभाग निकालात तळाशी राहिला आहे. लातूर विभागाचा निकाल ८४.१४ टक्के इतका लागला आहे. लातूर विभाग टक्केवारीत सर्वांचा मागे पडला हे या निकालातून स्पष्ट दिसते. मागील दशकात लातूर विभाग हा दहावी बारावीच्या निकालात सातत्याने अग्रस्थानी राहिला आहे. लातूर पॅटर्न हा दहावी बारावीच्या निकालासाठी राज्यात प्रसिद्ध होता. आताही नीट आणि जेईई परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांची पसंती लातूरलाच असते. नीट आणि जेईईची तयारी करण्यासाठी विद्यार्थ्यांची पहिली पसंती पुणे, दुसरी पसंती लातूर तर तिसरी पसंती बारामती ही आहे. ज्यांना शक्य आहे ते पालक आपल्या पाल्यांना राजस्थानातील कोटा येथेही पाठवतात मात्र महाराष्ट्रात लातूर पॅटर्नने आपली एक वेगळी ओळख निर्माण केली असताना लातूरची निकालात इतकी घसरण होणे हे आश्चर्यकारकच आहे. अर्थात निकालात घसरण फक्त लातूर विभागाची झाली असे नाही तर संपूर्ण राज्याचा निकाल यावर्षी घसरला आहे. यावर्षी राज्याचा निकाल ८९.७९ टक्के लागला. जो मागील वर्षीच्या तुलनेत २.०९ टक्क्यांनी कमी आहे. मागील वर्षी म्हणजे २०२५ साली बारावीचा निकाल ९१.८८ टक्के होता. यावर्षी बारावीचा निकाल का घसरला ? असा प्रश्न विचारला जात आहे. यावर्षी राज्य सरकारने कॉपी मुक्त परीक्षा अभियान राबवले त्यामुळे हा निकाल घसरला असण्याची शक्यता आहे. अर्थात हे चांगलेच झाले. कॉपीमुक्त परीक्षा या अभियानामुळे राज्याची खरी गुणवत्ता समोर आली. मध्यंतरी राज्याचा निकाल हा ९७ ते ९९ टाक्यांच्या दरम्यान असायचा आणि त्यात शेकडो विद्यार्थ्यांना पैकीच्या पैकी गुण मिळायचे. सरकारने कॉपीमुक्त परीक्षा हे अभियान राबवल्या मुळे कॉपिला काही प्रमाणात आळा बसला आहे. सरकारने हे अभियान यापुढेही चालू ठेवावे. विद्यार्थ्यांनी कॉपिवर अवलंबून न राहता वर्षभर नियमितपणे अभ्यास करावा कारण काळ झपाट्याने बदलत आहे. आता शिक्षणातही तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागला आहे. आज उत्तरपत्रिका शिक्षक तपासित आहेत पण भविष्यात या परीक्षांच्या उत्तरपत्रिका ए आय च्या मदतीने तपासल्या जातील. जेंव्हा ए आय तंत्रज्ञान वापरून उत्तरपत्रिका तपासल्या जातील तेंव्हा निकाल आणखी घसरण्याची शक्यता आहे. सोलापूर जिल्हा परिषदेचे तंत्रस्नेही शिक्षक दिसले गुरुजींनी गेल्या वर्षी त्यांच्या वर्गाच्या उत्तरपत्रिका ए आय तंत्रज्ञान वापरून तपासल्या. ए आय तंत्रज्ञानाने अवघ्या काही सेकंदात एक उत्तर पत्रिका तपासून होते हे त्यांनी दाखवून दिले त्यामुळे या तंत्रज्ञानाचा वापर भविष्यात उत्तर पत्रिका तपासण्याकरिता होणार हे नक्की त्यामुळे यापुढे विद्यार्थ्यांना अभ्यासाशिवाय गत्यंतर नाही. अर्थात राज्याचा एकूण निकाल घसरला असला तरी या निकालात मुलींनी नेहमीप्रमाणे बाजी मारली आहे. यावर्षी जवळपास ९३.१५ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. मुलांपेक्षा मुलींचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण जवळपास ४ टक्क्यांनी अधिक आहे. मुलांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ८६.८० टक्के इतके आहे. केवळ बारावीतच नाही तर दहावीच्या परीक्षेतही मुलींनी बाजी मारली. दहावीच्या परीक्षेत ९४.९६ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या तर मुलांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ८९.५६ टक्के इतके आहे याचाच अर्थ बारावी प्रमाणे दहावीच्या परीक्षेतही मुलींनी बाजी मारली. अर्थात दहावी असो की बारावी निकालात कायम मुलीच बाजी मारत असतात हे आपण यावर्षीच नाही तर मागील अनेक वर्षापासून पाहत आहोत. निकालात मुलींनी बाजी मारणे ही नक्कीच अभिमानास्पद बाब आहे. परीक्षार्थी मुलींची संख्या कमी असूनही उत्तीर्ण होणाऱ्या मुलींचे प्रमाण जास्त असणे हे मोठ्या शैक्षणिक आणि सामाजिक परिवर्तनाचे लक्षण आहे. सावित्रीच्या लेकिंची ही गरुड भरारी पाहून संपूर्ण महाराष्ट्राची मान अभिमानाने उंचावली आहे. एकेकाळी केवळ चूल आणि मूल इतकेच ज्यांचे जग होते त्या मुली आज गगनभरारी मारत आहेत. सावित्रीच्या लेकींचे हे यश निश्चितच प्रेरणादायी आहे. एकेकाळी ज्या मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवले जात होते त्याच मुली आज शिक्षण व्यवस्थेचे सर्वात मोठे संचित बनू पाहत आहे. पुरोगामी महाराष्ट्रासाठी ही अभिमानाची बाब आहे. कठोर परिश्रमाने मुलींनी हे यश मिळवले आणि इतरांना प्रेरणा दिली. कठोर परिश्रमातून मुलींनी हे यश मिळवून समाजाला एक सकारात्मक संदेश दिला आहे. दहाही, बारावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन आणि सर्व विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस मनापासून शुभेच्छा!

# औषधापेक्षाही मोठी रुग्णांप्रती आत्मीयता

श्रीमती मिनाक्षी मनोज मुदगल
राज्याध्यक्षा
महाराष्ट्र जिल्हा परिषद नर्सेस
संघटना एन जीपी३१३०





माणूस जन्म घेतो म्हणजे पहिला श्वास घेतो त्याची पहिली साक्षीदार असते ती परिचारिका आणि माणूस मरण पावतो म्हणजे शेवटचा श्वास घेतो त्याची शेवटची साक्षीदार असते ती परिचारिका
सन 1854 साली झालेल्या क्रिमिलियन युद्धातील जखमी सैनिकावर हातात दिवा घेऊन रात्री निस्वार्थीपणाने उपचार करणाऱ्या फ्लॉरेन्स नाईटिंगेल यांच्या सत्कार्याचा गौरव म्हणून त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ हा दिवस म्हणजेच त्यांचा जन्मदिवस 12 मे हा जागतिक परिचारिका दिन म्हणून साजरा केला जातो.
12 मे 1820 साली जन्म घेतलेल्या फ्लॉरेन्स नाइटिंगेल या आधुनिक शुश्रूषा शास्त्राच्या जनक-संस्थापिका होत्या
हा दिवस आरोग्यसेवा क्षेत्रातील परिचारिकांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी तसेच रुग्णसेवेच्या सत्कार्याचा सन्मान होऊन इतरांना त्यापासून प्रेरणा मिळण्यासाठी साजरा केला जातो.

**“आरोग्य सेवा आणि या प्रणालीचा मजबूत कणखर कणा म्हणजे परिचारिका ”**

**“ नर्स एक आवाजांचे नेत्तृत्व परिचारिका ”**

**माणुसकीच्या सेवेचा अखंड दीप**

‘पांढरा शुभ्र गणवेश अन् चेहऱ्यावर हास्य
असते,तिच्या एका स्पर्शातच रुणाचे अर्धे दुःख
विरते.
सेवेचा वसा घेऊनी त्या अहोरात्र जागतात,
खऱ्या अर्थाने नर्सेसच माणुसकीची ज्योत तेवतात.‘

परिचारिकांचे कार्य म्हणजे प्रत्यक्ष ईश्वरसेवाच आहे. संत तुकाराम महाराज म्हणतात त्याप्रमाणे—

**‘जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले, तोचि साधू ओळखावा, देव तेथेचि जाणावा.‘**

**रुग्णाप्रती आत्मीयता: औषधापेक्षाही मोठे औषध**

रुग्ण जेव्हा रुग्णालयात दाखल होतो, तेव्हा तो शारीरिक व्याधीसोबतच मानसिक भीतीखाली असतो. अशा वेळी परिचारिकांची आत्मीयता 'दुवा' म्हणून काम करते.रुग्णालयात आलेल्या प्रत्येक गरजूला 'आपले' मानून त्यांची सेवा करणाऱ्या परिचारिका या आधुनिक काळातील संतांपेक्षा कमी नाहीत. स्वतःच्या आरोग्याची पर्वा न करता, तासनतास उभं राहून सेवा करणे ही त्यांच्या कामाप्रती असलेल्या अढळ आस्थेची पावती आहे.

**कुटुंबाचा त्याग:** एक अदृश्य संघर्ष परिचारिकांच्या या सेवायज्ञात त्यांच्या कुटुंबाचा त्याग फार मोठा असतो. कर्तव्याची हाक आली की त्या रुग्णसेवेला प्राधान्य देतात. अनेकदा स्वतःची मुले घरी वाट पाहत असताना, त्या दुसऱ्यांच्या आयुष्याचे रक्षण करण्यासाठी रुग्णालयात राबत असतात. कुटुंबासाठी वेळ देऊ न शकल्याची हुरहुर मनात असली तरी, रुग्णाच्या चेहऱ्यावरील समाधान हीच त्यांची मोठी कमाई असते.

कृतज्ञता व्यक्त करण्याची वेळ
संत गाडगे बाबांनी स्वच्छतेतून आणि सेवेतून देव शोधला. परिचारिका देखील त्याच मार्गाने रुग्णसेवा करत असतात.

‘कधी आई, कधी बहीण होऊन या सावरतात,
स्वप्न स्वतःची विसरून दुसऱ्याचे आयुष्य सावरतात.
परिचारिका दिनी तुम्हास हा मानाचा मुजरा,
तुमच्यामुळेच फुलतो हा आरोग्यमयी नजारा.

आज या दिनानिमित्त, समाजातील प्रत्येक घटकाने या 'आरोग्य दूतांच्या' कार्याचा आदर करणे गरजेचे आहे. आपल्या वैयक्तिक सुखांचा त्याग करून रुग्णांच्या आयुष्यात हास्य फुलवणाऱ्या सर्व परिचारिकांना त्रिवार अभिवादन!

**परिचारिका समोरील आव्हाने:-**

सद्यस्थितीत सर्व परिचारिका या प्रचंड मानसिक तणावाखाली जगत आहेत ...

1. शासकीय- प्रशासकीय बाजूकडून नर्सेस ची होणारी हेळसांड..
2. 50% रिक्त पदामुळे पडणारा कामाचा अतिरिक्त ताण,अतिरिक्त पदभार त्यामुळे सतत बिघडणारी मानसिक स्थिती . त्याचसोबत नर्सेस यांनी सतत २४ तास काम करत राहवे हि अधिकारी आणि प्रा.आ. केंद्र येथील सहकारी वर्गाची अपेक्षा .
3. कामाचे तास आणि वेळ निश्चित नसणे त्यामुळे वैयक्तिक,कौटुंबिक आणि सांस्कृतिक विकासाला खीळ बसते .
4. आणि तरीही बऱ्याच वेळा आणि बऱ्याच ठिकाणी न समजून घेणारे प्रशासन ही गोष्ट नर्सेस च्या आरोग्याला मारक ठरत आहे..
5. परिचारिका यांच्या सुरक्षितेबाबत अजूनही शासनाकडे ठोस नियोजन नाही. रात्रपाळीमध्ये सुरक्षा पुरवली जात नाही त्यामुळे कोल्हापूर आणि भंडारा जिल्ह्यात जे प्रकार झाले तसे प्रकार होत आहेत.
6. वर्षानुवर्षे संरचनात्मक लेखापरीक्षण ण झालेले गळके, पडके, व राहण्यास अयोग्य असे निवासस्थान यामुळे नर्सेस ची होणारी कुचंबना
7. ग्रामीण आरोग्य खात्याचा भार हा फक्त त्यांनी उचलावा हि आरोग्य खात्यातील सर्वांची अपेक्षा. तोंड दाबून बुक्क्यांचा मार हि मराठी म्हण सार्थकी लावणारी यंत्रणा यामुळे जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत नर्सेस प्रवर्ग अक्षरश मानसिक तणावाखाली जीवन जगत आहे आणि हि सत्य परिस्थिती नाकारून चालणार नाही

आजच्या जागतिक परिचारिका दिनाच्या निमित्ताने राज्यातील नर्सेस ना शुभेच्छा संदेश देतानाच मी श्रीमती मिनाक्षी मनोज मुदगल राज्याध्यक्ष नर्सेस संघटना हे सांगू इच्छित आहे कि दबाव मग तो कोणताही असो तो जो अन्याकारक असेल आणि तुमचे मानसिक स्वास्थ खराब करत असेल त्याला झुगारून लावा. व्यक्त व्हा.
कारण रुग्णांना तुमची गरज आहे , तुम्ही ठीक तर रुग्ण ठीक...

# हणमंत पडवळ काव्यप्रेमी प्रेरणा पुरस्काराने सन्मानीत



आरंभ मराठी । सोलापूर

काव्यप्रेमी शिक्षक मंच आयोजित काव्यप्रेमी साहित्य, संस्था, प्रेरणा व शि.क.बा.पुरस्कार वितरण सोहळा नुकताच लोकमान्य टिळक सभागृह, हिराचंद नेमचंद वाचनालय किल्ला बागेसमोर सोलापूर येथे पार पडला. मा.प्रा. प्रकाश तानुबाई अण्णा महानवर (कुलगुरू पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर विद्यापीठ सोलापूर ) यांचे शुभहस्ते आणि डॉ.इ.जा. तांबोळी (जेष्ठ साहित्यीक तथा प्राचार्य सोशल महाविद्यालय सोलापूर ), यांचे अध्यक्षतेखाली व डॉ. सुहास पुजारी ( जेष्ठ समीक्षक व साहित्यीक )आणि मा. पद्माकर कुलकर्णी,(राज्य प्रतिनिधी मसाप पुणे) यांच्या उपस्थित पार पडला . विविध साहित्य कलाकृती, संस्था तसेच काव्यप्रेमी शिक्षक मंच साठी विशेष कार्य करणाऱ्या काव्यप्रेमी शिक्षक साहित्यीक यांना प्रेरणा पुरस्कार देण्यात आले. त्यामध्ये धाराशिव येथील कवी, साहित्यीक वात्रटिकाकार हणमंत पडवळ यांना त्यांच्या साहित्य सेवा आणि मंचासाठी केलेल्या कार्याची दखल घेवून त्यांना काव्यप्रेमी प्रेरणा पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. त्यांना या मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन आणि कौतुक होत आहे.

# सेवाभावी उपक्रमांनी ॲड. अजित गुंड- पाटील यांचा वाढदिवस उत्साहात साजरा




आरंभ मराठी । धाराशिव

ॲड. अजित गुंड पाटील यांचा वाढदिवस रुपामाता परिवारातर्फे विविध सामाजिक व सेवाभावी उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. रुपामाता उद्योग समूहाचे कार्यकारी संचालक, विश्व हिंदू परिषद – बजरंग दल धाराशिव जिल्हा उपाध्यक्ष तसेच रुपामाता फाऊंडेशनचे सचिव म्हणून कार्यरत असलेल्या ॲड. गुंड पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. वाढदिवसानिमित्त अंकुर शिशुगृह, मातोश्री वृद्धाश्रम आणि बाल सुधारगृह येथे अन्नधान्य, किराणा साहित्य, दुध पावडर तसेच फळांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमातून गरजू घटकांप्रती प्रेम, आपुलकी आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देण्यात आला. यावेळी विविध मान्यवर, सहकारी, मित्रपरिवार आणि सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींनी उपस्थित राहून ॲड. अजित गुंड पाटील यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थित मान्यवरांनी ॲड. अजित गुंड पाटील यांच्या पुढील सामाजिक व सेवाभावी कार्यासाठी शुभेच्छा देत, त्यांच्या नेतृत्वाखाली असे उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविले जावेत, अशी सदिच्छा व्यक्त केली.

# सहसंवेदना : माणुसकीचा खरा आधार

किशोर जाधव,
सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१





मानवी शरीर आणि मन अत्यंत संवेदनशील असते. शरीराला काही टोचले, लागले, पोळले अथवा कापले तर डोळ्यांतून पाणी येते, वेदना होतात आणि माणूस तळमळतो. ही संवेदना अर्थातच शारीरिक असते. कोणी रागाने बोलले तर आपण नाराज होतो, कोणी अपमानित केले तर शरमून जातो, कोणी द्वेष केला तर आपण चिडतो, तर कोणी विचारपूस केली नाही तर त्या व्यक्तीबद्दल नाराजी व्यक्त करतो. या सर्व मनाच्या संवेदना आहेत. या आपल्या वैयक्तिक भावना आहेत. परंतु दुसऱ्या एखाद्या व्यक्तीबाबत आपण हीच संवेदना बाळगतो का? यालाच ‘सहसंवेदना’ म्हणतात. दुसऱ्याच्या पायात काटा मोडला तर आपल्यालाही दुःख वाटते; त्या व्यक्तीबद्दल कळवळा निर्माण होतो. आपण पटकन धावत जाऊन त्याचा पाय आपल्या मांडीवर घेऊन हळुवारपणे काटा काढतो, तेव्हा ती सहसंवेदनाच असते. दुसऱ्याला होणाऱ्या वेदना आपण स्वतः अनुभवतो, तेव्हा खरी संवेदना प्रकट होते. समाजात शांतता, सुख, समृद्धी आणि प्रेम निर्माण करणारी भावना म्हणजे सहसंवेदना होय. दुसऱ्याचे दुःख हे आपले दुःख मानणे म्हणजे सहसंवेदनशील होणे. समाजातील सर्वच लोक संवेदनशील नसतात; परंतु त्यांना संवेदनशील बनवण्याचे कार्य सद्प्रवृत्तीच्या लोकांनी केले पाहिजे. हे वर्ष महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशतकीय जयंतीचे वर्ष आहे. सहसंवेदनेचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे महात्मा ज्योतिबा फुले होत. अस्पृश्य लोकांना पाण्यासाठी वनवण भटकावे लागत होते, हे पाहून १८६८ साली त्यांनी स्वतःच्या घरातील पाण्याचा हौद अस्पृश्यांसाठी खुला करून दिला. संवेदनशीलता आपल्या कृतीतून व्यक्त करणारे महात्मा फुले अद्वितीय होते. १८६३ साली महात्मा फुले यांनी ‘बालहत्या प्रतिबंधक गृह’ स्थापन केले. या गृहाच्या बाहेर त्यांनी अशी पाटी लावली होती की, “फसलेल्या विधवांनी येथे खुशाल बाळंत होऊन जावे.” बालकांच्या निघृण हत्या थांबाव्यात, ही त्यांच्या मनातील सहसंवेदना होती आणि ती त्यांनी कृतीतून प्रकट केली. पुढे या गृहात एका विधवेला झालेल्या अनौरस मुलाला त्यांनी दत्तक घेतले व त्याचे नाव ‘यशवंत’ ठेवले. त्या मुलाने पुढे त्यांचा वारसा मोठ्या श्रद्धेने चालवला. शेतकऱ्यांच्या कळवळ्याने महात्मा ज्योतिबा फुले यांनी नाडणूक आणि नागवणूक करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांवर आपल्या लेखणीतून आसूड ओढले. समाजातील सर्व थरांतील हीन-दीनांच्या उद्धाराची उत्कट तळमळ, त्यासाठी कोणताही धोका पत्करण्याची तयारी आणि बोलण्याप्रमाणे वागण्याचे धैर्य — हे सारे त्यांच्यातील प्रखर सहसंवेदनामुळेच होते. येशू ख्रिस्त यांनीदेखील, “मी या जगात सेवा करून घेण्यासाठी नव्हे, तर इतरांची सेवा करण्यासाठी आलो आहे,” असे म्हटले आहे. त्यांनी आपल्या शिष्यांना धर्मप्रबोधनासाठी पाठवताना सांगितले होते — “रोग्यांना बरे करा, कुष्ठरोग्यांची शुश्रूषा करा, मृतप्राय झालेल्यांना संजीवनी द्या, पिशाच्चबाधितांची सुटका करा आणि सेवेच्या माध्यमातून लोकांची मने जिंकून त्यांना धर्मोपदेश करा.” यावरून त्यांनी आपल्या अनुयायांमध्ये सहसंवेदना जागृत करण्याचे कार्य केले होते, हे स्पष्ट होते. “परोपकार हे पुण्य आणि परपीडा हे पाप” हा स्वतःमध्ये सहसंवेदना जागृत करण्याचा मूलमंत्र आहे. सहसंवेदना केवळ व्यक्ती-व्यक्तींमध्ये मर्यादित न राहता प्रत्येक सजीव प्राण्याबद्दल जागृत होणे आवश्यक आहे.

**संत गाडगेबाबांची दशसूत्रीही सहसंवेदना जागृत करणारी आहे** — भुकेलेल्यांना अन्न, तहानलेल्यांना पाणी, उघड्यानागड्यांना वस्त्र, गरीब मुला-मुलींना शिक्षण, बेघरांना आसरा, अंध, पंगू व रोग्यांना औषधोपचार, बेकारांना रोजगार, पशू-पक्षी व मुक्या प्राण्यांना अभय, गरीब तरुण-तरुणींचे लग्न आणि दुःखी-निराशांना हिंमत. हे सर्व देण्याची दानत एखाद्या व्यक्तीमध्ये सहसंवेदना जागृत झाल्याशिवाय निर्माण होऊ शकत नाही. आज जगभरात युद्ध, भूकबळी, हिंसा, महिलांवरील अत्याचार आणि पशुहत्या वाढत आहेत. हे सारे थांबवायचे असेल, तर सहसंवेदनेची ज्योत प्रत्येक व्यक्तीच्या मनात प्रज्वलित करावी लागेल. कारण सहसंवेदनाच माणुसकीचा खरा पाया आहे.

**हे पत्र मालक, मुद्रक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी,गवळी वाडा धाराशिव, ता. जि. धाराशिव, येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव)**
**संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८०** RNI NO.-2023/90078 कार्यालय; सुकर्मा कॅपिटल, बार्शी नाका, जिजाऊ चौक, धाराशिव-४१३५०१.मो. ९४२२०६८४२२. This letter was published by owner, printer, editor Chandrasen Govindrao Deshmukh, printed at Aadesh Printers, Ramkrishna Colony, Gawli Wada Dharashiv, Ta. Dist. Dharashiv, and published at Ramkrishna Colony, Gawli Wada, Dharashiv (Maharashtra).
**पुणे कार्यालयः1012,विंग B, पूर्वांचल,वेबग्योर स्कुलशेजारी, वाघोली,पुणे.**

# शेतकऱ्यांचा चिखलातील वनवास संपणार; २५ कि.मी. पाणंद रस्त्यांच्या कामाचा धडाका

**आरंभ मराठी । वाशी**

स्वातंत्र्यानंतर अनेक दशके उलटून गेली, तरी पावसाळ्यात शेतात जाण्यासाठी रस्ता नसल्याने शेतकऱ्यांना चिखलातून जीव मुठीत धरून वाट काढावी लागत होती. मात्र आता वाशी तालुक्यात 'मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते' योजनेला वेग आला असून पारगाव मंडळात तब्बल २५ किलोमीटर रस्त्यांची कामे युद्धपातळीवर सुरू झाली आहेत. भूम-परांडा-वाशी मतदारसंघाचे आमदार तथा माजी आरोग्यमंत्री प्रा. डॉ. तानाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली ही कामे सुरू असून शेतकऱ्यांच्या दळणवळणाचा प्रश्न मार्गी लागण्याची आशा आहे.





नुकतीच या कामांची पाहणी वाशीचे तहसीलदार प्रकाश मेत्रे, शिवसेना उपतालुका प्रमुख तथा कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक विकास तळेकर, पारगाव मंडळातील तलाठी व महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांनी केली. ज्या ठिकाणी पावसाळ्यात साधे वाहनही पोहोचत नव्हते, त्या ठिकाणी आता खडीकरण व मजबुतीकरण करून दर्जेदार रस्ते उभे केले जात आहेत. कामाच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसल्याचा इशारा देण्यात आला आहे. पारगाव मंडळातील २५ किलोमीटरचे काम पूर्ण झाल्यानंतर ही योजना टप्प्याटप्प्याने संपूर्ण वाशी तालुक्यात राबवली जाणार आहे. ज्या भागात शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो, त्या



ठिकाणांना प्राधान्य दिले जाणार असल्याचे सांगण्यात आले. शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे, पण पावसाळ्यात चिखलातून चालताना त्याचे जे हाल होतात ते शब्दांत सांगता येणार नाहीत. नामदार प्रा. डॉ. तानाजीराव सावंत यांनी ही वेदना ओळखून सातत्याने स्वतःच्या खिशातून अनेक रस्ते करून दिले. आता 'मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते' योजनेच्या माध्यमातून प्रत्येक बांधापर्यंत रस्ता पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे. पारगाव मंडळातील २५ किलोमीटरचे काम ही फक्त सुरुवात आहे, असे जिल्हा परिषद सदस्या सौ. सविता विकास तळेकर यांनी सांगितले.

## विविध वृत्त

### तेजस्विनी संस्थेकडून गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव



**आरंभ मराठी । धाराशिव**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. याच पार्श्वभूमीवर प्रसाद कॉलनी, माणिक चौक, धाराशिव येथील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार तेजस्विनी महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या वतीने करण्यात आला. संस्थेच्या अध्यक्षा नंदाताई पुनगडे यांच्या हस्ते कु. यशराज तुकाराम मुळे (९४ टक्के) व कु. श्रेयश बबन कांदे (९२.२० टक्के) या गुणवंत विद्यार्थ्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी पुनगडे मॅडम यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना, "ज्या विद्यार्थ्यांना अपेक्षित यश मिळाले नाही त्यांनी खचून जाऊ नये. प्रत्येक अपयश हे नवीन संधी घेऊन येत असते," असे प्रेरणादायी मत व्यक्त केले. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास विद्यार्थ्यांचे आई-वडील व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

### नाम फाऊंडेशनच्या 'जलतारा' योजनेचा कौडगाव येथे शुभारंभ



**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिव तालुक्यातील मौजे कौडगाव येथे नाम फाऊंडेशनच्या 'जलतारा' योजनेचा शुभारंभ उत्साहात करण्यात आला. जलसंधारण आणि पाण्याची पातळी वाढविण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाला शेतकऱ्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. यावेळी प्रायोगिक तत्वावर कौडगाव येथील शेतकरी राहुल नागनाथ थोरात यांच्या गट क्रमांक २०९ मध्ये ५x५x६ आकाराचा शोषखड्डा खोदून प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. या माध्यमातून पावसाचे पाणी जमिनीत मुरवून भूजल पातळी वाढविण्याचा प्रयत्न केला जात आहे. धाराशिव तालुक्यातील कौडगाव परिसरात आतापर्यंत ३२ जलतारा तयार करण्यात आले असून, या उपक्रमामुळे पाणीटंचाईवर मात करण्यास मदत होणार असल्याचे तहसीलदार डॉ मृणाल जाधव यांनी सांगितले.कौडगाव व खानापूर येथे पुढील कामांना सुरुवात करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

### नविन माध्यमिक विद्यालयाचे इयत्ता दहावी परीक्षेत उल्लेखनीय यश

**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिव येथील नविन माध्यमिक विद्यालयाने सन २०२५-२६ च्या दहावी बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयातील कु. प्रतीक्षा केसकूर हिने ९०.२० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. तर कु. इच्छा राणे हिने द्वितीय आणि कु. अस्मिता चव्हाण हिने तृतीय क्रमांक मिळवून विद्यालयाच्या यशात मानाचा तुरा रोवला. या यशाबद्दल सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव किसन हजारे, मुख्याध्यापिका श्रीमती शोभा ढेकने तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि विद्यार्थ्यांची कठोर मेहनत असल्याचे मुख्याध्यापिकांनी सांगितले. तसेच सर्व विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

### ग्रामीण प्रशालेत गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव



**आरंभ मराठी । माडज**

दहावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन करणाऱ्या ग्रामीण प्रशालेतील पहिल्या पाच गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रशालेच्या वतीने सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल शिक्षक, पालक आणि ग्रामस्थांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले. सत्कार करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांमध्ये प्रांजली दत्तात्रय वनकुद्रे (९६.६० टक्के), क्रांती संतोष गायकवाड (९४.६० टक्के), संस्कृती संतोष पाटील (९२.०० टक्के), गायत्री वैजनाथ शहापुरे (९१.२० टक्के) आणि शीतल बालाजी शिंदे (९०.२० टक्के) यांचा समावेश होता. यावेळी संस्थेचे अध्यक्ष व माजी मुख्याध्यापक विठ्ठल गायकवाड, सदस्य व माजी मुख्याध्यापक दिगंबर फुगटे, सदस्य नरेंद्र माने, पालक संतोष पाटील, दत्तात्रय वनकुद्रे तसेच प्रशालेतील शिक्षक बाळासाहेब पेठसांगवीकर, डॉ. बालाजी मदन इंगळे, व्यंकटेश चव्हाण, नंदना जमादार, विजय माने आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### अरुण नारायणराव गोरे यांचे निधन

**आरंभ मराठी । धाराशिव**



शहरातील ज्येष्ठ नागरिक, सेवानिवृत्त मंडळ अधिकारी अरुण नारायणराव गोरे यांचे सोमवार, ११ मे २०२६ रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्या निधनाने गोरे कुटुंबावर शोककळा पसरली असून, परिसरातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.ते नूतन विद्यामंदिरचे मुख्याध्यापक प्रदीपकुमार गोरे तसेच धाराशिव जिल्हा संस्कार भारतीचे जिल्हासचिव प्रवीणकुमार गोरे यांचे वडील होत.स्व. गोरे यांच्यावर सोमवारी दुपारी कपिलधारा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी विविध क्षेत्रातील मंडळी उपस्थित होती.

## १८ वर्षांनंतर पुन्हा भरला वर्ग; प्रेरणा हायस्कूलच्या २००८ च्या बॅचचा स्नेहमेळावा उत्साहात




**आरंभ मराठी । परंडा**

शालेय जीवनातील निरागस मैत्री, गुरुजनांप्रती असलेला आदर आणि तब्बल १८ वर्षांनंतर पुन्हा एकदा जुन्या वर्गात एकत्र येण्याचा आनंद अनुभवत परंडा येथील प्रेरणा हायस्कूलच्या 'स्नेहबंध २००८' बॅचचा गुरुवंदना व स्नेहमेळावा रविवारी (दि.१० मे) अत्यंत उत्साहात आणि भावनिक वातावरणात पार पडला. जुन्या आठवणींना उजाळा देताना माजी विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करत त्यांचा सन्मान केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापक हनुमंत यादव होते. प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध किर्तनकार व शिवव्याख्याते हभप बालाजी महाराज बोराडे, शिराळा रामेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक सुरेश गुंजाळ, प्रा. शरद झोंबाडे आणि शफीक पटेल उपस्थित होते. यावेळी या बॅचला घडविणाऱ्या २१ गुरुजनांचा श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये गोविंद जाधव, हनुमंत यादव, शफीक पटेल, शरद झोंबाडे, तुकाराम देशमाने, महादेव मारकड, जीवन सुरवसे, सुधीर यादव, दादासाहेब जगताप, सुरेश गुंजाळ, जालिंदर सरडे, रविंद्र गरड (लिपिक), राजाभाऊ बनसोडे, अशोक कोकणे, देविदास गरड, शिवा थोरबोले, राहुल गरड, श्रीमती उज्ज्वला वनवे, रणजित देशमुख, देशमुख सर आणि मनियार सर यांचा समावेश होता. स्नेहमेळाव्यात विविध मनोरंजक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. मित्र-मैत्रिणींनी जुन्या आठवणींना उजाळा देत मनमोकळ्या गप्पा, हास्यविनोद आणि सांस्कृतिक उपक्रमांत सहभाग घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक युवराज शिंदे यांनी केले, तर सूत्रसंचालन आशुतोष बनसोडे यांनी केले. हा स्नेहमेळावा यशस्वी करण्यासाठी आशुतोष बनसोडे, सागर सोनवणे, युवराज शिंदे, विकास सुर्यवंशी, समीर पाटील, सागर माने, स्वप्निल बोकेफोडे, अभिजीत बनसोडे, मोबीन सय्यद, अभिलाष सुर्यवंशी, तन्वीर मुजावर, सलमान शेख, विशाल कडबने, प्रसाद शेळके, योगेश भागडे, गजानन साळुंके, रमेश चोरमोले, प्रसन्न रणभोर, किर्ती पालके, ज्योती यादव, राजश्री इतापे, राजश्री शेळके, ज्योती शिंदे, मनिषा कवटे, वंदना बनसोडे आणि पल्लवी बोबडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## जनगणनेच्या कामासाठी ग्रामसाधन व्यक्तींना संधी द्यावी

### निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**आरंभ मराठी । धाराशिव**

महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटी, मंत्रालय मुंबई अंतर्गत निवड झालेल्या ग्राम साधन व्यक्तींना राष्ट्रीय जनगणनेच्या कामामध्ये संधी देण्यात यावी, अशी मागणी निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, उपजिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव अंतर्गत महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटीमार्फत धाराशिव जिल्ह्यासाठी १०० ग्राम साधन व्यक्तींची निवड करण्यात आली आहे. या ग्राम साधन व्यक्तींनी रोजगार हमी योजनेअंतर्गत झालेल्या कामांचे सामाजिक अंकेक्षण तसेच धाराशिव तालुक्यातील जिल्हा परिषद व नगर परिषद शाळांचे सर्वेक्षण मोबाईल ॲपच्या माध्यमातून अत्यंत जबाबदारीने व अचूकपणे पूर्ण केले आहे. सध्या जिल्ह्यात राष्ट्रीय जनगणनेचे काम सुरू असून, ४५ ग्राम साधन व्यक्ती हे काम करण्यास इच्छुक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. संबंधितांना संधी दिल्यास ते हे कामही प्रामाणिकपणे व जबाबदारीने पूर्ण करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. तसेच ग्राम साधन व्यक्तींना जनगणनेच्या कामामध्ये सहभागी करून त्यांच्या हाताला रोजगार उपलब्ध करून द्यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे. या निवेदनावर शरद जीवन पवार, नितीन ज्ञानेश्वर इंगळे, सुरज महावीर राऊत आणि अमोल हनुमंत अंकुशराव यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## नेपाळमधील आंतरराष्ट्रीय खो-खो प्रशिक्षण शिबिरासाठी प्रशांत पवार यांची तज्ज्ञ तांत्रिक अधिकारीपदी निवड


**आरंभ मराठी । धाराशिव**



ऑलिम्पिक कौन्सिल, आंतरराष्ट्रीय खो-खो फेडरेशन व एशियन खो-खो फेडरेशन संलग्न खो-खो इंडिया यांच्या मान्यतेने नेपाळ खो-खो असोसिएशनच्या वतीने १३ ते १६ मे २०२६ या कालावधीत कवरड हॉल, कीर्तीपूर, काठमांडू (नेपाळ) येथे लेव्हल-१ आंतरराष्ट्रीय खो-खो प्रशिक्षण शिबिर व परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. अशी माहिती बिभिषण पाटील यांनी दिली. या प्रशिक्षण शिबिरात सहभागी होणाऱ्या परीक्षार्थींना मार्गदर्शन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागातील सेवानिवृत्त राज्य व राष्ट्रीय क्रीडा मार्गदर्शक प्रशांत पवार यांची तज्ज्ञ तांत्रिक अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. खो-खो इंडिया चे संस्थापक सुरेश शर्मा यांच्या सहकार्याने ही नियुक्ती करण्यात आल्याचे सांगण्यात आले. प्रशांत पवार यांच्या निवडीबद्दल सुरेश शर्मा यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच खो-खो महाराष्ट्र कार्यकारिणीचे समन्वयक सुरेश गांधी, बिभिषण पाटील, अजय पवार, तानाजी आगळे, मंदार देशमुख, सचिन मोहिते आणि अमित भंडारी यांनीही अभिनंदन करून शुभेच्छा व्यक्त केल्या. दरम्यान, या आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण शिबिरासाठी प्रशांत पवार हे काठमांडू येथे रवाना झाले आहेत.

## शिवाई इन्स्टिट्यूटमध्ये पोषण आहार दिन साजरा

**आरंभ मराठी । उमरगा**



शिवाई इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग येथे शनिवारी (दि.९) पोषण आहार दिनविशेष कार्यक्रम उत्साहात पार पडला. "उत्तम आयुष्यासाठी योग्य आहार घ्या" असा संदेश यावेळी देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष बी.एच. बेडदुर्गे होते. प्रमुख उपस्थितीत डॉ. विजय बेडदुर्गे, डॉ. सारिका बेडदुर्गे, डॉ. अजय बेडदुर्गे, प्राचार्य अल्विन काळे व उपप्राचार्य डॉ. स्नेहल धर्माधिकारी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांचे पाच गट करून संतुलित आहार, रोगप्रतिकारशक्ती वाढवणारे अन्नपदार्थ व रोगप्रतिबंधात्मक आहार याविषयी माहिती देण्यात आली. बदलती जीवनशैली आणि चुकीच्या आहारामुळे मधुमेह, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा व कुपोषण यांसारखे आजार वाढत असल्याने पौष्टिक व संतुलित आहाराचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रमात प्रा. प्रशांत वाघमारे, प्रा. शुभम सूर्यवंशी, प्रा. स्वामिनी जाधव, प्रा. अभिजीत पाटील, प्रा. शहाबाज शेख, प्रा. दीपक झोरे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन अमोग वहन्माने यांनी केले.

आरंभ मराठी — आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

## कांद्याने शेतकरी अडचणीत, पर्यायी पीक धोरणाची वेळ

**आरंभ मराठी । धाराशिव**

राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी सध्या गंभीर आर्थिक संकटात सापडला असून केवळ तातुरत्या अनुदानाने हा प्रश्न सुटणार नाही. शेतकऱ्यांना दिलासा देतानाच पर्यायी पीक धोरण राबविण्याची गरज असल्याची मागणी भाजप आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्र्यांना सविस्तर पत्र पाठवले आहे. राज्यात वाढते तापमान, अवकाळी पाऊस, वादळे आणि बाजारातील कोसळलेले दर यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. साठवणुकीतील कांदा खराब होणे, भिजून सडणे आणि बाजारात अत्यल्प दर मिळणे यामुळे शेतकरी आर्थिक कोंडीत सापडले आहेत. सध्या बाजारात कांद्याला



केवळ ४५० ते ५५० रुपये प्रति क्विंटल दर मिळत असून उत्पादन खर्च, वाहतूक, मजुरी आणि साठवणूक खर्चाच्या तुलनेत हा दर परवडणारा नसल्याचे पाटील यांनी स्पष्ट केले आहे. महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक कांदा उत्पादन करणारे राज्य असून दरवर्षी १२ ते १३ दशलक्ष मेट्रिक टन उत्पादन घेतले जाते. देशाच्या एकूण उत्पादनात राज्याचा ३५ ते ४० टक्के वाटा असल्याने उत्पादन वाढले की बाजारात अतिरिक्त पुरवठा होऊन दर कोसळतात, असेही त्यांनी नमूद केले.या परिस्थितीवर दीर्घकालीन उपाय म्हणून राज्य शासनाच्या 'महाराष्ट्र राज्य संपीडित जैववायू (CBG) धोरण २०२६' अंतर्गत अतिरिक्त कांदा क्षेत्रातील शेतकऱ्यांना नेपियर गवत व इतर जैवऊर्जा पिकांकडे वळविण्यासाठी स्वतंत्र पीक विविधिकरण योजना राबवावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. नेपियर गवताचा खर्च कमी असून वर्षातून अनेक वेळा कापणी होत असल्याने शेतकऱ्यांना स्थिर उत्पन्न मिळू शकते. तसेच CBG प्रकल्पांशी करार शेती मॉडेल जोडल्यास हमी बाजारपेठ उपलब्ध होऊन कांद्याच्या अतिरिक्त उत्पादनाचा ताण कमी होईल, असा विश्वासही आमदार पाटील यांनी व्यक्त केला.

## शेतातील वादातून दोन गट आमनेसामने; उमरग्यात परस्परांविरोधात गुन्हे दाखल

**आरंभ मराठी । उमरगा**

उमरगा तालुक्यातील नारंगवाडी येथे शेतातील रस्ता व ऊस पिकातून वाहन नेण्याच्या कारणावरून दोन गटांमध्ये झालेल्या वादाचे रूपांतर मारहाणीमध्ये झाले. या प्रकरणी दोन्ही गटांनी एकमेकांविरोधात उमरगा पोलीस ठाण्यात तक्रारी दिल्या असून परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पहिल्या घटनेत फिर्यादी उमेश दिनकर ठाकुर (वय ३२, रा. नारंगवाडी, ता. उमरगा) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. १० मे २०२६ रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास नारंगवाडी शिवारातील शेत गट क्रमांक २११/१४ मध्ये ट्रॅक्टर शेतातून नेण्याच्या कारणावरून आरोपी मुकेश सदानंद पवार, गजानन सदानंद पवार, सदानंद नामदेव पवार व संगीता नामदेव पवार यांनी शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी व दगडाने मारहाण करून जखमी केले. तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. तर दुसऱ्या घटनेत फिर्यादी मुकेश सदानंद पवार (वय ३१, रा. नारंगवाडी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्याच दिवशी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास शेत गट क्रमांक २१५ मध्ये ऊस पिकातून जेसीबी व ट्रॅक्टर घालण्याच्या कारणावरून बालाजी ठाकुर, दिनकर ठाकुर, उमेश दिनकर ठाकुर व निलेश बालाजी ठाकुर यांनी शिवीगाळ करून लाथाबुक्यांनी तसेच स्टीलच्या कळशीने मारहाण करून जखमी केले व धमकी दिल्याचे म्हटले आहे. दोन्ही फिर्यादींवरून उमरगा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२)(३), ३(५) अन्वये परस्परांविरोधात गुन्हे नोंद करण्यात आले असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# अर्थकारणात अडकली नैसर्गिक प्रसूती

## रुग्णांची होतेय लूट; खासगी रुग्णालयांत सिझेरियनचे प्रमाण ५० टक्क्यांवर; ऑडिट करणारी यंत्रणाच नाही

गणेश गायकवाड । आरंभ मराठी

**तामलवाडी - महिलांसाठी नैसर्गिक प्रसूती हा सर्वात सुरक्षित आणि मूलभूत आरोग्याधिकार मानला जात असतानाही धाराशिव जिल्ह्यात खासगी रुग्णालयांमध्ये सिझेरियन प्रसूतीचे प्रमाण झपाट्याने वाढत असल्याचे वास्तव समोर आले आहे. वैद्यकीय गरज नसतानाही मोठ्या प्रमाणावर सिझेरियन शस्त्रक्रिया केल्या जात असल्याची चर्चा असून, यामागे कोट्यवधी रुपयांचे अर्थकारण दडले असल्याचा गंभीर आरोप होत आहे. जिल्ह्यातील अनेक खासगी रुग्णालयांमध्ये प्रसूतीसाठी दाखल होणाऱ्या महिलांना शेवटच्या क्षणी भीतीचे वातावरण निर्माण करून सिझेरियनसाठी तयार केले जात असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. "बाळ गुदमरेल", "आईच्या जीवाला धोका होईल", "तत्काळ ऑपरेशन करावे लागेल" अशा शब्दांत नातेवाईकांवर मानसिक दबाव आणला जातो. त्यामुळे घाबरलेल्या कुटुंबीयांकडून तातडीने संमती घेतली जाते आणि नैसर्गिक प्रसूतीचा पर्याय बाजूला पडतो.**

धाराशिव जिल्ह्यात सुमारे ५० टक्के प्रसूती सिझेरियन पद्धतीने होत असल्याचे समोर आले आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) निकषांनुसार केवळ १० ते १५ टक्के प्रसूतींमध्येच सिझेरियनची आवश्यकता असते. मात्र प्रत्यक्षात अनेक खासगी रुग्णालयांमध्ये हे प्रमाण ४० ते ५० टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. त्यामुळे आरोग्य क्षेत्रात चिंता व्यक्त केली जात आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (IIM) संस्थेने केलेल्या सर्वेक्षणानुसार देशभरात दरवर्षी होणाऱ्या सुमारे ७० लाख सिझेरियन प्रसूतींपैकी तब्बल ९ लाख सिझेरियन वैद्यकीयदृष्ट्या अनावश्यक असल्याचे स्पष्ट झाले आहे. म्हणजेच जवळपास १२ टक्के शस्त्रक्रिया केवळ गरज नसतानाही केल्या जात असल्याचा निष्कर्ष या अहवालातून समोर आला आहे. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या (NFHS) अहवालातही खासगी रुग्णालयांतील सिझेरियनचे वाढते प्रमाण अधोरेखित करण्यात आले आहे. या अहवालानुसार खासगी रुग्णालयांमध्ये ४०.९ टक्के प्रसूती सिझेरियनद्वारे होतात, तर शासकीय रुग्णालयांमध्ये हे प्रमाण ११.९ टक्के इतके आहे. म्हणजेच खासगी आरोग्य व्यवस्थेत सिझेरियनचे प्रमाण लक्षणीयरीत्या अधिक असल्याचे स्पष्ट होते. विशेष म्हणजे, प्रसूतीचा खर्च हा रुग्णालयाचे ठिकाण, सुविधा आणि रुग्णांच्या आर्थिक परिस्थितीनुसार ठरवला जात असल्याचे दिसून येते. सामान्य नैसर्गिक प्रसूतीसाठी ३ हजार ते १५ हजार रुपये आकारले जातात, तर सिझेरियनसाठी २५ हजार रुपयांपासून थेट १ लाख रुपयांपर्यंत खर्च आकारला जातो. त्यामुळे सिझेरियन हा केवळ वैद्यकीय निर्णय नसून मोठे आर्थिक गणित बनल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. आरोग्य तज्ज्ञांच्या मते, अनेक महिलांना नैसर्गिक प्रसूतीची संधी दिली जात नाही. प्रसूतीच्या नैसर्गिक प्रक्रियेला वेळ लागतो, सतत निरीक्षण करावे लागते आणि डॉक्टर व कर्मचाऱ्यांची उपलब्धता आवश्यक असते. त्याउलट सिझेरियनमुळे कमी वेळेत प्रक्रिया पूर्ण होते आणि आर्थिकदृष्ट्याही रुग्णालयांना अधिक फायदा मिळतो. त्यामुळे काही ठिकाणी सिझेरियनकडे कल वाढल्याचे सांगितले जाते.





### शासकीय रुग्णालयांत सिझेरियनचे प्रमाण तुलनेने कमी

खासगी वैद्यकीय महाविद्यालये व मोठ्या रुग्णालयांमध्ये सिझेरियन प्रसूतीचे प्रमाण ६० टक्क्यांपेक्षा अधिक असल्याचे सांगितले जाते. त्याउलट जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये हे प्रमाण सुमारे ३८ टक्के असल्याचे समोर आले आहे. यावरून खासगी व शासकीय आरोग्य व्यवस्थेतील फरक स्पष्ट होत आहे.

### ऑडिट करणारी समिती केवळ कागदावरच

खासगी रुग्णालयांमध्ये होणाऱ्या सिझेरियन प्रसूतींचे परीक्षण करण्यासाठी कोणतीही प्रभावी यंत्रणा कार्यरत नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. शासनाने जेजे रुग्णालयाच्या निवृत्त अधिकारी डॉ. स्मिता डावर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती. मात्र ही समिती प्रत्यक्षात सक्रिय नसून केवळ कागदोपत्रीच असल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे खासगी रुग्णालयांवर नियंत्रण ठेवणारी यंत्रणाच नसल्याने मनमानी वाढत असल्याचा आरोप होत आहे.

### महिलांवर मानसिक दबाव टाकल्याच्या तक्रारी

प्रसूतीसाठी दाखल झालेल्या महिलांना व त्यांच्या नातेवाईकांना शेवटच्या क्षणी घाबरवून सिझेरियनसाठी तयार केले जात असल्याच्या अनेक तक्रारी आहेत. "आता निर्णय घेतला नाही तर जीव धोक्यात येईल" अशा प्रकारचे शब्द वापरून मानसिक दबाव आणला जातो. त्यामुळे भीतीपोटी कुटुंबीय तातडीने शस्त्रक्रियेस संमती देतात. आरोग्य क्षेत्रातील जाणकारांच्या मते, महिलांना योग्य समुपदेशन, दुसरे वैद्यकीय मत आणि नैसर्गिक प्रसूतीसाठी पुरेसा वेळ देणे आवश्यक आहे. आरोग्य क्षेत्रातील वाढते व्यापारीकरण, सिझेरियनच्या नावाखाली होणारी आर्थिक लूट आणि त्यावर नियंत्रण ठेवणाऱ्या यंत्रणांचा अभाव यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. महिलांच्या आरोग्याशी संबंधित या गंभीर विषयाकडे शासनाने तातडीने लक्ष देऊन खासगी रुग्णालयांतील सिझेरियन प्रसूतींचे नियमित ऑडिट, तपासणी आणि पारदर्शकता अनिवार्य करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

# एल निनोच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात एक लाख 'जलतारा' खड्ड्यांचे उद्दिष्ट – जिल्हाधिकारी पुजार



आरंभ मराठी । तेर

यंदा संभाव्य 'एल निनो'च्या संकटाच्या पार्श्वभूमीवर पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता लक्षात घेता, जिल्ह्यात "जलतारा" योजना लोकचळवळ म्हणून प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी दिली. स्थानिक स्वराज्य संस्था, विविध सामाजिक संस्था आणि शेतकरी यांच्या लोकसहभागातून ही योजना यशस्वी करण्याचे आवाहनही त्यांनी केले. धाराशिव तालुक्यातील पाडोळी व मेंढा येथे जलतारा योजनेचा शुभारंभ जिल्हाधिकारी पुजार यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास सतीश एखंडे, बालाजी पवार, मेंढा येथील सरपंच नामदेव माळी, पोलीस पाटील योगेश माळी, शालेय समिती अध्यक्ष नितीन घुले, सोसायटीचे माजी चेअरमन मोतीलाल कोचेटा, माजी सरपंच शिवाजी माळी, कृषी सहाय्यक आर. एस. कदम तसेच ग्राम महसूल अधिकारी एस. एम. जाधव आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना जिल्हाधिकारी पुजार म्हणाले की, हवामान खात्याने वर्तवलेल्या संभाव्य 'एल निनो' प्रभावामुळे पावसात खंड पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे पडणाऱ्या पावसाचा प्रत्येक थेंब जमिनीत जिरवणे अत्यंत आवश्यक झाले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात पावसाळ्यापूर्वी "जलतारा" योजना हाती घेण्यात आली आहे. या योजनेचा मुख्य उद्देश जलसंधारण करणे, जमिनीची पाणी साठवण क्षमता वाढवणे आणि त्याद्वारे शेती उत्पादनात वाढ करून शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढवणे हा आहे. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर योजना राबविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, किमान एक लाख खड्डे शेतकऱ्यांच्या शेतात तयार करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले. जलसंधारणासाठी ही योजना अत्यंत महत्त्वाची असून सर्व शेतकरी बांधवांनी यात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही जिल्हाधिकारी पुजार यांनी केले.

# तीर्थक्षेत्र गडदेवधरीकडे जाणारा रस्ता खड्डेमय; भाविकांसह ग्रामस्थांचा संताप

आरंभ मराठी । येडशी



धाराशिव तालुक्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र गडदेवधरीकडे जाणाऱ्या रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून, खड्डेमय रस्त्यामुळे वारंवार लहान-मोठे अपघात घडत आहेत. शासनाने तीर्थक्षेत्र म्हणून घोषित केलेल्या या ठिकाणी जाण्यासाठी सुरक्षित व सुस्थितीत रस्ता नसल्याने भाविक आणि परिसरातील ग्रामस्थांतून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. गडदेवधरी हे हिंदू आणि मुस्लिम समाजाच्या श्रद्धेचे केंद्र मानले जाते. येथे असलेला हजरत शेख फरीद शकर गंजयांचादर्गाहजारो भाविकांचे श्रद्धास्थान असून, राज्यासह परराज्यातूनही दररोज मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येत असतात. विशेषतः गुरुवार आणि रविवारी येथे भाविकांची मोठी गर्दी होत असून, कंदुरी कार्यक्रमांसाठीही अनेक जण या ठिकाणी येतात. गडदेवधरीकडे जाण्यासाठी दोन प्रमुख मार्ग आहेत. एक मार्ग येडशी येथून तर दुसरा राष्ट्रीय महामार्गाला जोडलेला आहे. दररोज शंभराहून अधिक वाहने या मार्गावरून ये-जा करतात, तर गुरुवार व रविवारी ही संख्या दोनशेच्या पुढे जाते. वाढत्या वाहनांच्या रहदारीमुळे रस्त्याची अवस्था अधिकच बिकट झाली आहे. याच रस्त्याचा वापर सोनेगाव, भानसगाव, जहागीरदारवाडी आणि कुमाळवाडी येथील नागरिकांनाही करावा लागतो. मात्र, खड्ड्यांनी भरलेल्या रस्त्यामुळे वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत असून, अपघाताचा धोका कायम निर्माण झाला आहे. गावाजवळील धोकादायक वळणावर अपघातप्रवण क्षेत्राचा कोणताही इशारा फलक नसल्याने वारंवार अपघात घडत असल्याचे नागरिकांनी सांगितले. दरम्यान, धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील येडशीजवळ सुरू करण्यात आलेल्या टोलनाक्यामुळे अनेक चारचाकी वाहनचालक टोल टाळण्यासाठी गडदेवधरी मार्गाचा पर्याय निवडत आहेत. त्यामुळे या रस्त्यावरील वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढली असून, आधीच खराब झालेल्या रस्त्याची आणखी दुरवस्था होत आहे. भाविकांची गैरसोय आणि वाढते अपघात लक्षात घेता प्रशासनाने तातडीने रस्त्याची दुरुस्ती करून सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिक व भाविकांकडून होत आहे.

# नारंगवाडी येथे रस्ते खोदकाम करताना विद्युत पोलचे नुकसान : काही वेळातच वीजपुरवठा सुरळीत

आरंभ मराठी । नारंगवाडी

उमरगा तालुक्यातील नारंगवाडी परिसरात तुळजापूर–बसवकल्याण–नारंगवाडी मार्गावरील रस्त्याचे काम सुरू असताना जेसीबीचा धक्का लागून विद्युत पोल वाकल्याची घटना घडली होती. या घटनेमुळे सुरक्षेच्या दृष्टीने महावितरण विभागाकडून तातडीने दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले. दुपारी अंदाजे साडेतीन ते सव्वाचार या कालावधीतच वीजपुरवठा बंद ठेवण्यात आला होता. त्यानंतर परिसरातील वीजपुरवठा सुरळीत सुरू करण्यात आल्याची माहिती महावितरण विभागाने दिली.महावितरणचे वरिष्ठ तंत्रज्ञ तानाजी जाधव यांनी सांगितले की, परिसरात वेळोवेळी तत्परतेने सेवा देण्याचे काम सुरू असून काही लोक जाणीवपूर्वक चुकीची माहिती पसरवून रात्रभर लाईट बंद असल्याचा गैरसमज निर्माण करत आहेत. प्रत्यक्षात दुरुस्तीच्या कामासाठी केवळ पाऊण तास ते एक तास वीजपुरवठा बंद ठेवण्यात आला होता.याबाबत कनिष्ठ अभियंता अलीम सय्यद यांनी सांगितले की, माडज शाखेची संपूर्ण टीम ग्राहकांना उत्तम सेवा देण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास तातडीने दुरुस्ती केली जाते. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन त्यांनी केले.दरम्यान, दोन दिवसांपूर्वी दुरुस्तीच्या कामासाठी दिवसा एक ते दीड तास वीजपुरवठा बंद ठेवावा लागला होता. मात्र शेतकऱ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून कनिष्ठ अभियंता अलीम सय्यद यांनी अतिरिक्त दोन तास थ्री-फेज वीजपुरवठा सुरू करून दिला. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त करण्यात आले. शेतकरी अंकुश भोसले यांनी सांगितले की, महावितरण अधिकारी व कर्मचारी शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेतात आणि दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर अतिरिक्त वेळ वीज देऊन त्यांनी शेतकऱ्यांप्रती असलेली आपुलकी दाखवून दिली आहे. तसेच ग्राहक लखन जाधव यांनीही "कधीही फोन केल्यास प्रतिसाद सकारात्मक मिळतो, अशी प्रतिक्रिया दिली.

# सनराईज इंग्लिश स्कूलचा सलग दुसऱ्या वर्षी दहावीला शंभर टक्के निकाल

**येडशी** :- धाराशिव तालुक्यातील येडशी येथील सनराईज इंग्लिश स्कूलने दहावी बोर्ड परीक्षेत सलग दुसऱ्या वर्षी शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखत गुणवत्तेचा ठसा उमटवला आहे. यावर्षीच्या परीक्षेत जावळे श्रीकृष्ण रामराजे याने ९३ टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक पटकावला. ठाकूर महारुद्र उमाकांत याने ९२ टक्के गुणांसह द्वितीय, तर सावंत अनिकेत परमेश्वर याने ९२ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला. तसेच अनपट रीतू बालाजी – ८८ टक्के, पटेल आलिया खालिद – ८७ टक्के, जाधव साईराज गोपाळ – ८६ टक्के, तवले यशवंत जयवंत – ८५ टक्के, शेख चाहत अहमदपाशा – ८२ टक्के, नागटिळक जान्हवी बालाजी – ७९ टक्के आणि अथर्व अमर खरसाडे – ७७ टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले.या यशाबद्दल संस्थेच्या व शाळेच्या वतीने सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन करण्यात येत असून सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

आरंभ मराठी

## लाभार्थ्यांना ३८८ प्रमाणपत्रांचे वाटप

# परंडा येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

आरंभ मराठी । परंडा

राज्य शासनाच्या "छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियान टप्पा-१" अंतर्गत परंडा महसूल मंडळाचे शिबिर गुरुवारी (दि.८) स्व. गोपीनाथ मुंडे सभागृह, परंडा येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. नागरिकांच्या विविध महसुली अडचणींचे तत्काळ निराकरण करून शासनाच्या सेवा थेट जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिराचे उद्घाटन माजी आमदार सुजितसिंह ठाकूर तथा तहसीलदार निलेश काकडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी अप्पर तहसीलदार पुनम पाटील, नायब तहसीलदार विजयकुमार बाडकर, नायब तहसीलदार मिलींद पराळे, नगर परिषदेच्या पाणी पुरवठा समितीचे सभापती रमेशसिंह परदेशी, माजी नगरसेवक राहुल बनसोडे, सत्तार पठाण आदी मान्यवर उपस्थित होते. शिबिरामध्ये महसूल विभागासह विविध शासकीय विभागांचे स्वतंत्र स्टॉल उभारण्यात आले होते. संबंधित विभागांचे माहिती फलक दर्शनी भागावर लावण्यात आल्याने नागरिकांना विविध योजनांची माहिती सहज उपलब्ध झाली. महसूल मंडळ परंडा अंतर्गत बळीराजा पांदण रस्त्यांची माहिती संकलित करण्यात आली असून, पुढील तपासणीसाठी उपअभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग परंडा, उपअभियंता जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग परंडा तसेच पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात आले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. शिबिरात ७/१२ उताऱ्यांचे सार्वजनिक वाचन करण्यात आले. तसेच नागरिकांना डिजिटल ७/१२ आणि ८-अ उताऱ्यांचे वाटप करण्यात आले. उपअधीक्षक भूमी अभिलेख परंडा सुरेश कापसे व कार्यालयातील प्रमोद गायकवाड यांनी स्वतः उपस्थित राहून ई-मोजणी, पाणंद रस्ते, नकाशे, अभिलेखांचे गट क्रमांक व सर्वे क्रमांक यासंदर्भात नागरिकांना सविस्तर मार्गदर्शन केले. शिबिरात नागरिकांच्या अडचणी ऐकून त्यांचे तत्काळ निराकरण करण्यात आले. यावेळी विविध प्रमाणपत्रांचेही वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंडळ अधिकारी दुर्गाप्पा पवार यांनी केले, तर आभार ग्राम महसूल अधिकारी बालाजी डावखरे यांनी मानले.




### मान्यवरांच्या हस्ते ३८८ विविध प्रमाणपत्रांचे वितरण

या महसूल समाधान शिबिरामध्ये फेरफार दुरुस्ती, डिजिटल ७/१२, ८-अ उतारे, उत्पन्न प्रमाणपत्र, वय प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्व, अल्प भूधारक प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, नॉन-क्रीमीलेयर, रहिवासी तसेच जन्म-मृत्यू प्रमाणपत्र अशा विविध प्रकारच्या एकूण ३८८ अर्जांचा निपटारा करण्यात आला. संबंधित लाभार्थ्यांना माजी आमदार सुजितसिंह ठाकूर व तहसीलदार निलेश काकडे यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

# लोहारा शहरात महिलांसाठी सुलभ शौचालयाची मागणी

## विजयकुमार ढगे यांचे जिल्हा परिषद अध्यक्षांना निवेदन

आरंभ मराठी । लोहारा



तालुक्याचे मुख्य केंद्र असलेल्या लोहारा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात महिलांसाठी सर्व सोयींनी सुसज्ज सुलभ शौचालय उभारण्यासाठी जिल्हा परिषदेची जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी नगरसेवक तथा सार्वजनिक बांधकाम सभापती विजयकुमार ढगे यांनी केली आहे. धाराशिव जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा अर्चनाताई राणा जगजीतसिंह पाटील या लोहारा येथे आढावा बैठकीसाठी आल्या असताना विजयकुमार ढगे यांनी त्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. यावेळी जिल्हा परिषद उपाध्यक्षा उषाताई गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियवंदा महाडदळकर, पंचायत समिती सभापती पल्लवी दादासाहेब जानकर तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.लोहारा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक हा मुख्य बाजारपेठ आणि दळणवळणाचा केंद्रबिंदू मानला जातो. या परिसरात ग्रामीण भागातील महिलांची दररोज मोठ्या प्रमाणात ये-जा असते. मात्र, महिलांसाठी सुसज्ज सार्वजनिक शौचालयाची सुविधा उपलब्ध नसल्याने त्यांची मोठी गैरसोय होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. नगरपंचायत कार्यालयाकडे सुलभ शौचालय उभारणीसाठी आवश्यक निधी उपलब्ध असला तरी योग्य जागेअभावी हे महत्त्वपूर्ण काम अनेक दिवसांपासून रखडले आहे. संबंधित परिसरात जिल्हा परिषदेच्या मालकीची मोकळी जागा उपलब्ध असून, सामाजिक हित लक्षात घेऊन त्या जागेतील काही भाग शौचालय उभारणीसाठी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी विजयकुमार ढगे यांनी केली आहे. महिलांचे आरोग्य, सुरक्षा आणि सन्मानाशी संबंधित हा संवेदनशील विषय असल्याने जिल्हा परिषद प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन तातडीने जागा उपलब्ध करून द्यावी, अशी आग्रही मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## तामलवाडी – वडगाव (काटी) रस्त्याचे काम तीन महिन्यांपासून ठप्प; उकरलेल्या रस्त्यामुळे नागरिकांचे हाल

### ७.२० कोटींच्या सिमेंट रस्त्याची दुरवस्था; ठेकेदार गायब, निकृष्ट कामावर ग्रामस्थांचा संताप

आरंभ मराठी / तामलवाडी



तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी ते वडगाव (काटी) या महत्त्वाच्या सात किलोमीटर रस्त्याचे काम गेल्या तीन मि चंड त्रास सहन
करावा लागत आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत सुरू असलेल्या या रस्त्याच्या कामासाठी तब्बल ७ कोटी २० असला, तरी
प्रत्यक्षात कामाची गती अत्यंत संथ असून अनेक र्थी, शे




मागील वर्षी गाजावाजा करत या सिमेंट रस्त्याच रस्त्य काही ठिकाणी
सिमेंटचे पूल बांधण्यात आले. मात्र, नव्याने उभा ऱ्याने होत आहेत.
नागरिकांनी याबाबत संबंधित विभागाकडे नाराज ची म
सध्या रस्त्याची परिस्थिती अत्यंत बिकट बनली सोड मोठी कसरत
करावी लागत असून लहान-मोठे अपघात होण्य मीवर यता व्यक्त
केली जात आहे. रात्रीच्या वेळी रस्त्यावर कोणत ालून डगाव (काटी)
आणि परिसरातील गावांसाठी तुळजापूरला ये-जा करण्यासाठी हा प्रमुख मार्ग मानला जातो. शेतमालाची वाहतूक, वि नंदिन कामासाठी
नागरिकांचा या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वावर असतो. मात्र, काम बंद पडल्यामुळे नागरिकांना पर्यायी रस्त्यांचा वाप आणि खर्च सहन
करावा लागत आहे.

ग्रामस्थांनी संबंधित विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून रखडलेले काम सुरू करावे, कामाची गुणवत्ता तपासावी आणि निष्काळजीपणा करणाऱ्या ठेकेदारावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. काम सुरू करून रस्ता व्यवस्थित पूर्ण होणार नसेल तर उकरून ठेवण्याचा अधिकार ठेकेदाराला कोणी दिला? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

## काटीचे सुपुत्र यशपाल हंगरगेकर कार्यकारी अभियंतापदी विराजमान

आरंभ मराठी / तुळजापूर



तुळजापूर तालुक्यातील काटी येथील सुपु
यशपाल अभिमान हंगरगेकर यांची बृहन्मुं
महानगरपालिकेत (BMC) 'कार्यकारी अ
(स्थापत्य) वर्ग-१' या महत्त्वपूर्ण पदावर
झाली आहे. त्यांच्या या यशामुळे धाराशिव
जिल्ह्यासह संपूर्ण तालुक्यात आनंदाचे वा
निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांच